**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०१५

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

**तीन : लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विना परवाना वाळू उत्खनन करण्याचे प्रकार महसूल विभागाच्या निदर्शनास येणे, अलिबाग, पेण, रोहा आदि भागात विना परवानगी हजारो ब्रास अनधिकृत वाळूचा साठा व वाहने जप्त करण्यांत येणे, अनधिकृत उत्खनन केल्याने बांधकामाच्या किंमतीमध्ये वाढ होणे, पर्यायाने अनधिकृत वाळू काढण्याच्या प्रकारात काही तालुक्यात महसूल विभाग सक्रीय असणे, याबाबत संपूर्ण जिल्ह्यासाठी वाळूची आवश्यकता असल्याने महसूल विभागामार्फत वाळू लिलावाबाबत जाहिरनामा प्रसिध्द करण्याची गरज निर्माण होणे, अनधिकृत वाळू उत्खनन होत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेला नाहक आर्थिक भूर्दंड पडणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सर्वात जास्त जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळा या मराठवाडा विभागामध्ये असणे, यांची एकूण संख्या ३७९ असणे, या शाळांमधून सर्व गोरगरीब शेतकऱ्यांची मुले-मुली शिक्षण घेणे, त्यापैंकी २९९ शाळांना राजपत्रित मुख्याध्यापक वर्ग २ ची पदे मंजूर असणे, गेल्या अनेक कालावधीपासून जवळपास २४० मुख्याध्यापकांची पद रिक्त असणे, त्याठिकाणी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून शिक्षकांना तात्पुरती नियुक्ती देणे, यामुळे शाळांच्या गुणवत्तेवर परिणाम होणे, परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, ही पदे भरण्याची वारंवार मागणी शासनाकडे होणे, या गंभीर विषयाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. विनायकराव मेटे,** पांडुरंग फुंडकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"महाराष्ट्रातील मागास मराठवाड्यातील बीड जिल्ह्यामध्ये दळणवळणाची साधने नसल्यामुळे या भागाची प्रगती न होणे, अहमदनगर-बीड-परळी या रेल्वेमार्गाची मागणी मागील २५ वर्षापासून असणे, सदरील रेल्वे मार्गाच्या भारताच्या इतिहासात प्रथमच लोकसभेमध्ये घोषणा होणे, या रेल्वे मार्गाला सन १९९५-१९९६ साली मंजूरी मिळणे, सन १९९५-१९९६ साली २६१ कि.मी. लांबीच्या रेल्वे मार्गाची किंमत ३५३ कोटी असणे, याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारने ५०:५० टक्के भागिदारी प्रमाणे मागील २० वर्षांत केवळ ३१० कोटी रुपये रक्कम मिळणे, सदरील रेल्वेमार्ग हा मागील २० वर्षापासून रखडलेला असल्यामुळे आज त्याची किंमत ३००० कोटी रुपयांपर्यंत गेलेली असणे, हा प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडलेला असल्यामुळे जिल्हावासियांनी राज्य शासनाकडे वेळोवेळी आंदोलने करुन मागणी करणे, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.रेल्वेमंत्री यांची शिष्ट मंडळाने रेलभवन, नवी दिल्ली येथे भेट घेऊन आर्थिक तरतुदीची केलेली मागणी, रेल्वेमंत्री यांनी रेल्वे अर्थसंकल्पामध्ये १४४ कोटींची केलेली तरतूद, त्यानुसार ५० टक्केच्या भागीदारीने महाराष्ट्र शासनाने करावयाची तेवढ्याच रकमेची आर्थिक तरतूद, म्हणून सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १४४ कोटी रुपयांची तरतूद करणाची होत असलेली मागणी, यावर शासनाने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** संजय दत्त, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. रामहरी रुपनवर, शरद रणपिसे, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, जयंवतराव जाधव, अमरसिंह पंडित, दिपकराव साळुंखे, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात रायगड जिल्ह्यात सामाजिक बहिष्काराचे आणखी एक प्रकरण रोहा तालुक्यातील डोंगरी गावात गावकीने विविध कारणांसाठी २१ कुटूंबाना वाळीत टाकणे, पेण तालुक्यातील कोळीवाडा येथे विनय महादेव भोईर यांना सावत्रभावाने व गावकीने वाळीत टाकणे, त्या पाठोपाठ आता औरंगाबाद जिल्ह्यातील जाधववाडीतील सिध्देश्वर कॉलनीतील रंजना सचिन पांडे यांच्या कुटुंबियांना देखिल जातपंचायतीने वाळीत टाकल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडणे, एकाच जातीतील, एकाच गोत्रातील तरुणासोबत प्रेमविवाह केला म्हणून कंजारभाट समाजाच्या एका दांम्पत्याबरोबरच त्यांच्या

आई-वडील, भावांना जातपंचायतीने ८ वर्षापासून समाजातून बहिष्कृत केले असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, पुण्यातील पिंपरी-चिंचवड, आळंदी, इचलकरंजी, संगमनेर व औरंगाबाद या ठिकाणी भरविण्यात आलेल्या वेगवेगळ्या जातपंचायतीमध्ये दंडापोटी म्हणून सदर दाम्पत्याने जातपंचायतीला आतापर्यंत १ लाख ७० हजार रुपये भरुनही बहिष्कार मागे न घेणे, अनेकदा विनवण्या करुन, दंड भरुनही जातपंचायत बहिष्कार मागे घेत नसल्यामुळे वैतागलेल्या जोडप्यांनी समाजाविरुध्द बंड पुकारण्याचा घेतलेला निर्णय, यामुळे त्यांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, अशा घटना राज्यांत हल्ली वारंवार होत असल्यामुळे जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत सदरील कुटुंबाना न्याय मिळण्याबाबत शासनाने जातपंचायतीवर व गावकीवर करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**चार : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

## - अशासकीय कामकाज -

## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**पाच : अशासकीय विधेयके -**

**पुरःस्थापनार्थ -**

(१) सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक १ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०१५ - श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे

(२) सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१५ - श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे

**सहा : अशासकीय ठराव :-**

**(बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार हे ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

**(१) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६५ -**

"राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाणे, त्यामुळे बहुतांश जिल्ह्यांत वायू प्रदुषण व जलप्रदुषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसा खाणीपासून होत असलेले प्रदूषण, लहान मोठे उद्योग त्यात थर्मल पॉवर स्टेशन,

एम.आय.डी.सी.तील उद्योग, सिमेंट कारखाने, पेपर मिल, यापासून होत असलेले प्रदूषण, उद्योजक करारनामा करुन देखील नियम पाळत नसणे, विशेषत: ज्या भागात दुर्मिळ वनसंपदा तसेच वन्यजीवांचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणीसाठी परवानगी देण्याचा चाललेला प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच अपुऱ्या साधन सामग्रीमुळे प्रदूषणावर आळा घालण्याकरिता शासनास येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्वांवर आळा घालण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, तसेच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) श्री.संदिप बाजोरिया, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४० -**

"नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असे असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) श्री.दिपकराव साळुंखे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २९ -**

"राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १२ मार्च, २०१५

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.